INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# डॉ. श. नू. पठाण यांच्या 'टाकीचे घाव' या आत्मचरित्रातील शैक्षणिक संघर्षाचे विदारक चित्रण

# (Dr. S.N. Pathan's Autobiography 'Takiche Ghav' depicts the Educational Struggles)

**डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे**
स्व. निर्धन पाटील वाघाये
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लाखनी, जि. भंडारा
E-mail: geogharechandrashekhar@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/12.2022-82446483/IRJHIS2212008**

**प्रस्तावना :**

सहाव्या प्रकरणात डॉ. श. नु. पठाण यांच्या 'टाकीचे घाव' या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. अतिशय गरीब परिस्थितीत वडील नूरमहमंद पठाण आणि अमीनाबी नूरमहंमद पठाण या दाम्पत्यांच्या पोटी लेखकाचा जन्म झाला. त्यांचे वडील गवंडी काम करायचे. दगडांना आकार देऊन घर बांधणे हा त्यांचा अनियमित व्यवसाय होता. ते अतिशय कष्टाचे आणि मेहनतीचे काम करायचे. लेखक बारा–तेरा किलोमीटरपर्यंत पायी प्रवास करीत शाळेत जात असत. घरच्या गरिबिमुळे हप्त्यातून दोन–तीनदा घरात भाकरी नसल्यामुळेत्यांना उपाशीच शाळेत जावे लागे. पिठाची व्यवस्था करुन भाकरी बनवून आई आपल्या मुलासाठी बारा–तेरा किलामीटरपर्यंत पायी जायची. अशा विलक्षण गरीब परिस्थितून दारिद्रयाचे दाहक चटके सहन करुन 'कुलगुरु' पदापर्यंतची मजल गाठली. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षण संचालक ते कुलगुरु हा त्यांचा प्रवास शुन्यातून विश्वनिर्मितीचाच प्रवास आहे. या सर्व जीवनवृत्तांताचे चिकित्सक अध्ययन टाकीचे घाव या आत्मचरित्रात टाकीचे केले आहे.

**स्वरुप आणि वैशिष्टये::**

प्रखर बुध्दिमान विद्यार्थी, कुशाग्र, संशोधक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, कुशल व धडाडीचा प्रशासक अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचे धनी म्हणून डॉ. श. नू. पठाण ओळखले जातात. वनस्पतीशास्त्र विषयाात प्रदिर्घ काळ संशोधन, पीएच.डी च्या विद्यार्थींना यशस्वी मार्गदर्शन, जर्मनी, जपान, अमेरिका, इंडोनेशिया, नेपाळ इत्यादी देशातील आंतरराष्ट्रीय परिषदात शोधनिबंधाचे सादरीकरण करुन त्यांनी देशविदेशात आपल्या नावाचा गौरव वाढविला आहे. युरोप, अमेरिका इत्यादी देशातील विद्यापीठांना भेटी देऊन आपली शैक्षणिक, वैचारिक उंची वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांच्यातील ज्ञानपिपासू वृत्तीचा शोध घेण्याचा प्रबंधलेखकाने प्रयत्न केला आहे.

मुस्लीम गरीब कुटुंबात जन्माला येऊन प्रवरानगरच्या महाविद्यालयात अधिव्याख्याता, विभाग प्रमुख, प्रपाठक, पुणे येथे प्राचार्य, मुंबईच्या सिडनहॅम या शासकिय महाविद्यालयाचे प्राचार्य, महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक, ८५ वर्षाची प्रदीर्घ परंपरा असणाऱ्या नागपूर विद्यापीठात कुलगुरु असा त्यांचा स्तिमित करणारा प्रवास आहे. रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' या उपक्रमातूनच डॉ. पठाणांनी आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. तल्लख बुध्दिमत्ता, उदंड आत्मविश्वास आणि अपार कष्ट यांच्या बळावर दयनीय आर्थिक परिस्थितीच्या चिखलातही कर्तृत्वाचे रसरशीत कमल कसे उगवू शकते, त्याची कल्पना 'टाकीचे घाव' या पठाणांच्या आत्मवृत्तातून येते. त्यांच्या कष्टरंजीत आणि अभिमानास्पद आयुष्याचा चिकित्सक अभ्यास प्रबंधलेखकाने केला आहे. त्यातून मूलगामी स्वरुपाचे निष्कर्ष काढले आहेत. त्यांचा हा अलौकिक प्रवास विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि युवकांना निश्चितच प्रेरीत करणारा आहे. व्यासंगी संशोधक आणि कुशल प्रशासक म्हणून ते जेवढे मोठे आहेत तेवढेच 'माणूस' म्हणून ते सर्वश्रेष्ठ आहेत. वाटयाला आलेल्या गरिबीची लाज न बाळगता मित्र आणि ज्येष्ठ शिक्षक, प्राध्यापकांकडुन आर्थिक, मानसिक सहकार्य घेवून आपल्या शैक्षणिक जीवनाचा गौरवशाली असा त्यांनी प्रवास केला. त्यांच्यावर सदाचरणाचे फार मोठे संस्कार आहेत. त्यांनी अखंडितपणे आई – वडिलांची सेवा करुन आपल्या कुटुंबियांची काळजी वाहिली. प्रेमळ मुलगा, भाऊए पती, शिष्य आणि आदर्श गुरु अशा साऱ्या भुमिका त्यांनी चोखपणे बजावल्या आहेत. त्यांच्या पिंप्रि जनसेन हया गावातील जातीय सलोखा आणि अस्पृश्य हया लोकातील सौहार्दाचे वातावरण त्यांना विशेष भावले. सर्वधर्मसमभावाची त्यांची वृत्ती माणसांना जोडणारी अशी आहे. 'प्रेम देणे–प्रेम घेणे' हा त्यांचा स्वभावधर्म आहे. प्रस्तुत आत्मचरित्रातील त्यांच्या उत्क्रमणशील जीवनाचे मर्मग्राही दर्शन अधोरेखीत केले आहे.

**'टाकीचे घाव' मधील शैक्षणिक जीवन संघर्ष :**

लेखकाने दिनांक २५ ऑगष्ट १९४७ रोजी लग्न झाले. त्या लग्नात त्यांनी हुंडा घेतला नाही. आपले पैसे वाचले म्हणून त्यांच्या सासऱ्यांनी आनंदाने आणि आग्रहाने वऱ्हाडच्या बसगाडीच्या भाडयाचे पैसे त्यांना दिले. लग्नाच्या वेळेस आणि पुढे लग्नानंतर सौभाग्यवती नोकरीवर लागेपर्यंत त्यांना आर्थिक चणचणच होती. बहिणीच्या लग्नाचे थोडेफार कर्ज त्यावेळी त्यांच्यावर होते. तो परिस्थिती सांगतांना लेखक म्हणतात, ''खर्चाला कामीलावावी म्हणून एस. टी. न करता मी छोटया गाडीने वऱ्हाडी मंडळींना न्यायचे ठरवले. कारण लग्नाचे गावजेवणही देणे आवश्यक होते. त्यामुळे फुड इन्स्पेक्टर श्री. सव्वासे या मित्राच्या माध्यमातून मी एक मेटॅडोर ठरविली आणि एकविस नातेवाईक मित्रांना घेवून सांगली गाठले.लग्नपत्रिकाही ऐका मित्राने त्याच्या छापखान्यातून छापून दिल्या होत्या. लग्नाचा सुट ही नगरच्याकापड दुकानातून मला माझे मित्र प्रा. डी. बी. ठुबे यांनी त्यांच्या क्रेडीटवर उधारीनेच घेऊन दिला होता. मी बुट मात्र अवघ्या चाळीस रुपयांचा नगदीनेच घेतला होता. अशी त्याची कौटुंबिक आणि सामाजिक पार्श्वभूमी असल्याचा आपल्याला प्रत्यय येतो.

'टाकीचे घाव' या डॉ. श. नू. पठाण यांच्या आत्मचरित्रामध्ये शिक्षणाविषयीचा फार मोठा जीवनसंघर्ष त्यांनी मांडला आहे. प्रतिकुल परिस्थितीचा मुकाबला करुन आपण शिक्षण घेतले पाहिजे. या ध्यासातूनच लेखक शिकू लागले आणि कठोर मेहनत घेवून आर्थिक परिस्थितीवर मात करुन आपले जीवन फुलविले. लहानपणापासूनच दारिद्रयाचे विष पचवून आशावादाचे अंकूर जोपासून त्या अंकूरातून वटवृक्षासारखे व्यक्तिमत्व त्यांनी घडविले.

डॉ. श. नू. पठाण यांचे प्राथमिक शिक्षण पिप्रिं जलसेन येथिल जिल्हा परिषदेच्या 'जीवनशिक्षण विद्यामंदिर' या शाळेत झाला. ती शाळा गावाबाहेरच्या एका टेकडीवर होती. साधी टिनाच्या पत्र्याची हि शाळा टेकडीवर निसर्गरम्य वातावरणात होती. या शाळेच्या बाजुलाच मुक्ताईची चावडी होती तर टेकडीच्या पायथ्याशी हरिजनांची वस्ती होती. त्या शाळेत पुरेशी जागा नव्हती. काही

व्हरांडयात भरत तर काही वर्ग आतल्या खोल्यामध्ये विद्यार्थी संख्या वाढली की काही वर्ग गावामध्ये भाडयाच्या खोलीत भरत शाळा पुरेशा जागेची नसली मात्र विद्यार्थी घडावा या जिद्दीतून शिक्षक कार्य करित असत. आपल्या वर्गाचा निकाल चांगला लागावा म्हणून धडपडत. त्यातून विद्यार्थी घडत, त्यांच्यावर संस्कार होत असत. सन १९५८ साली लेखक चवथ्या वर्गात होते. तेव्हा पहाटे पाच वाजता गावातून प्रभातफेरी निघायची 'रघुपती राघव राजाराम' आणि 'वैष्णव जन तो तेणे कहिये, जे पीर पराई जाने रे' अशासारखी महात्मा गांधींना प्रिय असणारी भजने विद्यार्थी गात असत. हि प्रभातफेरी हरिजनवस्तीत विसर्जन व्हायची. मग सर्व विद्यार्थी हातात झाडू घेवून हरिजन वस्ती स्वच्छ करायचे. असे संस्काराचे धडे त्यांना लहानपणापासूनच मिळायचे. म्हणूनच शिक्षणाबद्दलची त्यांची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. श्री. लोंढे गुरुजी आणि श्री. साळवे गुरुजी या दोन शिक्षकाने जे वर्षभर अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांकडून बसवून घेतले होते. त्यात नकला, पोवाडे, गाणी आणि नृत्यनाटिका इत्यादींचा समावेश असायचा. एका नाटकात त्यांनी भुमिकाही केली होती. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या या संस्कारातूनच त्यांनी पुढे महाविद्यालयीन स्तराव स्नेहसंमेलन प्रसंगी वा अन्य कार्यक्रमाप्रसंगी पुढाकार घेतला होता.

सातवी उत्तीर्ण झाल्यानंतर आता पुढे परिस्थितीमूळे आता शिकायचे नाही असा त्यांनी निर्धार केला होता. घर कामात वडीलांना साथ दयावी असे त्यांना वाटे परंतु शिक्षणाची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. जनसेवा विद्यालय वडझिरे या शाळेमुळे त्यांना शिकण्याचा पुढचा मार्ग मोकळा झाला. गावावरुन सहा किलोमीटर पायी जाऊन शिकावे लागत असे. त्या हायस्कुलची एक इमारत नव्हतीच तर एक वर्ग रामाच्या मंदिरात, एक वर्ग चावडीत, तर एक वर्ग भाडयाच्या खोलीमध्ये असे विद्यालय होते. रयत शिक्षण संस्थेच्या स्वावलंबी शिक्षण पध्दतीतून लेखकाने स्वत:ला घडविले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा व शिका' या उपक्रमाचा लेखकावर विलक्षण प्रभाव पडला. कारण या योजनेमुळे त्यांना शिकता आले. बी. एस्सी. झाल्यानंतर एम. एस्सी. चे शिक्षण घेतले. हे शिक्षण त्यांनी 'कमवा व शिका' या उपक्रमातूनच केले. त्यासाठी शारीरिक परिश्रमाची कठोर ढोरमेहनतीची कामे त्यांना करावी लागली.

नोकरी करीत असतांना त्यांची वनस्पतीशास्त्रात कोल्हापुर विद्यापिठात पीएच. डी. सुरु होती. डॉ. जे डी. निंबाळकर यांचे त्यांना त्यासाठी मार्गदर्शक लाभत होते. संशोधन कार्यासाठी डॉ. ए. आर. कुलकर्णी यांची त्यांना मदत झाली. लेखक जेव्हा परदेशात एखादा शोधनिबंध वाचण्यासाठी जायचे तेव्हा डॉ. ए. आर. कुलकर्णी हयांची त्यांना मोलाची मदत होत असे. व्यासंगी प्राध्यापक, श्रेष्ठ संशोधक आणि विद्यार्थ्यांवर प्रेम करणारा एक अत्यंत आदर्श पालक असा त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात एकवटल्याचा डॉ. श. नू. पठाण यांना अनुभव आलेला आहे. लेखकाला जेव्हा मुंबई विद्यापिठात संशोधक मार्गदर्शक म्हणून नियुक्ती मिळाली. तेव्हा संशोधनाची नविन दालने डॉ. ए. आर. कुलकर्णी सरांनी त्यांना सांगितली. त्यांच्या सहकार्यामुळेच त्यांना अमेरिका, युरोप आदी देशात शोधनिबंध वाचण्याची संधी मिळाली.

डॉ. ए. आर. कुलकर्णी बद्दल सांगतांना ते म्हणतात, ''सरांचा एखादा विद्यार्थी व्यवस्थित स्थिरावलेला नसेल तर त्याची निवृत्तीनंतरदेखील जिथे संधी मिळेल तिथे त्या विद्यार्थ्यांसाठी ते नवीन संधी शोधतात. आयुष्यभर आपल्याच विषयाचा व्यासंग ठेवून, वनस्पतीशास्त्र विषयाच्या प्रत्येक आधुनिक शाखेत श्रेष्ठ दर्जाचे संशोधन करुन विद्यार्थ्यांचे पालकत्व पत्करुन विद्यार्थ्यांसाठी झटणारे प्रा. डॉ. ए. आर. कुलकर्णी सर मला एक ज्ञान तपश्विच वाटतात.वनस्पतीशास्त्र विषयाचा हा महामेरु आपल्या विद्यार्थ्यांसाठी सतत झिजत असतो. जात–पात, सीमा, लिंगभेद या गोष्टी या तपस्वाच्या जवळ कधी फिरकत देखील नाहीत. माझ्यासाठी तर वनस्पतीशास्त्राचे ते दिपस्तंभच आहेत. हा दीपस्तंभ मला आजही सतत मार्गदर्शक करत असतो. माझ्या संशोधनकार्याचे ते आधारवडच आहेत. अशा अनेकांच्या मार्गदर्शनातून त्यांना त्यांचे शैक्षणिक जीवण घडवता आले.

**'कमवा व शिका' – या उपक्रमाची उपलब्धी आणि लेखक :**

'कमवा व शिका' च्या उपलब्धीमुळेच लेखक खऱ्या अर्थाने घडले. आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामुळे त्यांनी आपले शिक्षण अर्धवट सोडले असते परंतू 'स्वावलंबन हेच ब्रीद' असलेले शिक्षण देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका'या उपक्रमामुळे त्यांना आपले शिक्षण पूर्ण करता आले.

साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्थेत लेखक बी. एस्सी. झाले. ते 'कमवा व शिका' या उपक्रमातूनच ! त्या उपक्रमाविषयी सांगतांना लेखक म्हणतात. ''येथे शिकतांना 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत महाविद्यालयात मला दररोज तीन तास काम करावं लागत असे. त्यात बऱ्याचवेळा भांगलणीच काम असायचं. कॉलेजची थोडी शेती होती. त्यामध्ये भुईमुंग, कांदे इत्यादी पिकं आम्ही घेत असू.'' अशी मेहनतीची कामे त्या उपक्रमात करावी लागत असत. डॉ. बी. एस. पाटील. त्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्यांनी मोकळया विस्तिर्ण जागेत द्राक्षाची बाग फुलवली. 'कमवा व शिका' या योजनेतून लेखकाला द्राक्षाच्या बागेत द्राक्षाची वेल लावण्यासाठी खड्डा करावा लागे. मग कधी कधी मुरुम आणि खडक लागायचा. तेव्हा पहारीने खणावे लागे. मग तो खड्डा परत खतमातीने भरुन द्राक्षाची रोपे लावून, ती जगवून बाग फुलवावी लागे. त्यातला एक प्रसंग लेखक म्हणतात, ''एकदा आम्ही शेतात कांदे लावत होतो. तेव्हा एक दिवस पाण्याची जळाली होती. त्यामूळे दिवसभर मोटार दुरुस्तीचं काम सुरु होतं. मोटार संध्याकाळी दुरुस्त झाली. तेव्हा आमचे प्राचार्य आम्हाला म्हणाले की, ''पोरांनो, तुम्ही आज रात्रीला शेतीला पाणी द्या.'' मग आम्ही रात्रीला शेतामध्ये पाणी द्यायला गेलो. मोटर चालू केली आणि अंधारात फारसं काही दिसलं नाही. मोटरचा पाईप प्रेशरने निघाला आणि त्याचा जोरदार पाण्याचा फवारा आमच्या अंगावर उडाला आम्ही ओलेचिंब झालो. तश्याच ओलेचिंब अवस्थेत आम्ही कांद्यांना पाणी दिलं.

अशा पध्दतीने आम्ही मिळेल ते काम केव्हाही करत असू. शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर येथे एम. एस्सी. करतांना याच योजनेतून त्यांनी आपले शिक्षण घेतले. खूप अभ्यास करणे अणि खूप कष्ट करणे ही दोन्ही ध्येय असल्याचे ठरवूनच सहजपणे ते करायचे. जिद्द आणि पराकोटीचा संघर्ष करण्याची प्रबळ इच्छाशक्ती यातून त्यांना आव्हाने पेलता आली. एम. एस्सी. करतांना वस्तीगृहात सकाळी बरोबर सात वाजता घंटा झाली की, एम. ए आणि एम. एस. सी. चे योजनेतील विद्यार्थी खाकी हॉफ पॅन्ट, खाकी हॉफ शर्ट आणि हातामध्ये खुरप घेऊन विद्यापिठाच्या शेतावर कामाला निघुन जात असत. त्या योजनेतून कमालीची शिस्त त्यांना लागली. चिखलात काम करतांना अनेकदा पायात काटे रुतायचे. चिखल कोळपण्याचे काम कठीण असल्याचे लेखक सांगतात. कोळप्याच्या मागे राहून रुमणे धरणे हे त्यांना जमायचे नाही. कधी कधी ते कोळपे जरासे इकडेतिकडे झाले की, गवताऐवजी भातच निघायचा. मग लेखक कोळप्याचे जू काखेत घालून कोळपे पुढे ओढण्याचे काम करीत. असे अनेक कामे त्यांना करावी लागत असत. काम करतांना कधी महाविद्यालयाच्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यी त्यांना पहायच्या त्यावेळी कामाची लाज न बाळगता बिनधास्त आपले काम प्रामानिकपणे करीत असत. एकदा तत्कालीन राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गीरी यांनी त्यांच्या महाविद्यालयातील 'कमवा व शिका' या योजनेला भेट दिली. त्यासाठी त्यांनी एक कृत्रिमरित्या खळ त्याठिकाणी तयार केला होता. त्या खळयात धान, भुईमुंगाच्या शेंगा या सर्व गोष्टी ठेवलेल्या होत्या आणि खळयामध्ये कसे काम केले जाते याचे प्रात्याक्षिक राष्ट्रपती महोदयांना करुन दाखविण्यात आले. या उपक्रमाची मा. राष्ट्रपती महोदयांनी खूप स्तुती केली होती. अशा अनेक क्षणांना मंतरलेले दिवस असल्याचे लेखक सांगतात. या योजनेमुळेच त्यांना उत्तम विटा तयार करता आल्या. स्वावलंबी जीवन तयार करण्याची ही अत्यंत महत्वपूर्ण अशी योजना होती. एखादयाला नोकरी लागली नाही तरी स्व:ताच्या पायावर उभे राहण्याची ताकद त्या योजनेतून नक्की मिळते. एवढा मोठा आत्मविश्वास त्या योजनेने लेखकांशिवाय अनेकांना दिला.

अशाप्रकारे 'कमवा व शिका' या नविण्यपूर्ण योजनेचे अनेक प्रसंग, घटना लेखकांनी प्रस्तुत आत्मचरित्रात रेखाटलेले आहेत.

**'टाकीचे घाव'— मधिल अभिव्यक्ती :**

डॉ. श. नू. पठाण यांच्या व्यक्तिमत्वातला साधेपणा त्यांच्या आत्मचरित्रात पूर्णत: पहायला मिळतो. तेथील निवेदनशैली, भाषाशैली, वर्णनकौशल्य आणि प्रसंगचित्रणे पाहतांना रसिकांना ते विलक्षण भावते. त्यातील घटना आणि प्रसंग, गरीबी आणि ती दूर करण्यासाठीचा त्यांनी घेतलेला ध्यास हया सर्व गोष्टी तरुणांना नक्कीच प्रेरित करणाऱ्या आहेत. प्रस्तुत आत्मचरित्राला 'पुरस्कार' लिहितांना सुप्रसिध्द साहित्यिक आणि वक्तेराम शेवाळकर म्हणतात,''पिंप्री जनसेन हे दुष्काळी गाव कुठे ? पणतल्लख बुध्दीमत्ता, उदंड आत्मविश्वास आणि अपार कष्ट यांच्या बळावर दयनिय आर्थिक परिस्थितीच्या चिखलातही कर्तृत्वाचे रसरशीत कमळ कसे उगवू शकते ? त्याची कल्पना 'टाकीचे घाव' या डॉ. पठाणांच्या आत्मवृत्तातून येते. शिक्षण प्राप्तीसाठी कष्टपूर्ण जीणे सोसलेल्या विद्यार्थ्यांची स्थापणा तयाने संपादन केलेल्या गुणवत्तेमुळे राज्याचे शिक्षण संचालकपदी होऊ शकते, त्याचा हा कष्टरंजित, पण अभिमानास्पद वृत्तांत आहे. ते लिहितांना निश्चितच लेखकाच्या कष्टांची कुसुमे झाली असल्याचा प्रत्यय वाचकांना आल्याशिवाय राहणार नाही. असा मोठा आशावाद राम शेवाळकर यांनी व्यक्त केला आहे. या आत्मकथनातुन वैफल्याचे व्यसन जडलेल्या हतबल तरुणांना निश्चितच प्रेरणा मिळू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. एकूणच हया आत्मचरित्राचा रंग—रुप पाहूनशेवाळकरांच्या मताशी आपण सहमत झाल्याश्विाय राहणार नाही.

**मुल्यमापन :**

'टाकीचे घाव' या आत्मचरित्राचे निवेदन अतिशय साधे आहे. प्रकरणाचा समारोप करतांना आपल्या निवेदनातून ते तत्वज्ञान सांगतात. तिथली तात्विकता रसिकांच्या मनावर पकड निर्माण करते. तेथील संपूर्ण निवेदन हे प्रमाण मराठीतूनच असून त्यावर हिंदी, उर्दू, इंग्रजी भाषेचा पगडा नाही. संवादातही ते हिंदीचा वापर करीत नाहीत. त्यांचे मराठीवर निरतिशय प्रेम असल्याचाच आपल्याला प्रत्यय येतो. डॉ. पठाण विज्ञानाचे विद्यार्थी असूनही तेथील प्रसंगचित्रणातून आणि वर्णन कौशल्यातून त्यांच्यातील ललित लेखकाचा परिचय होतो. येथे कितीतरी 'टाकीचे घाव' आहेत. न लाजता, रंग सफेदी न करता त्यांनी केले आहे. त्यात प्रदर्शन नाही, देखावा नाही; आहे तो केवळ प्रांजळपणा! प्रस्तुत आत्मचरित्रातून त्यांची मातृभक्ती आणि पितृभक्ती पहायला मिळते. शिक्षणाची अपार ओढ, त्यासाठी अपरिमित कष्ट घेण्याची तयारी, संकटावर मात करण्याची जिद्द, आव्हान पेलण्यातील आत्मविश्वास, त्यांचे व्यवहारचातुर्य, मोठे होण्याचे स्वप्न, भेदाभेद विसरुन प्रेम मिळवित आणि देत आनंदीवृत्तीने जगणे ही डॉ. पठाणांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये आहेत. येथील भाषाशैली साधी, सरळ आहे. कुठेही अलंकारप्रचुरता नाही. वाध्यप्रचार, म्हणी, उखाणे व तत्सम भाषेतील सौंदर्यप्रसाधने येथे नाहीत. तरीही प्रमाणिक निवेदनामुळे ते रसिकांना विलक्षण भावते. संस्कारित करते, मूल्यांचे बिजारोपन करते आणि विद्यार्थी, युंवकांना प्रेरीत करते. हे या आत्मचरित्राचे यश म्हणावे लागेल. प्रस्तुत आत्मचरित्राची एकुणच सर्व अंगांचा परामर्श घेत लेखकाचे जीवनवृत्त आणि आत्मचरित्राची वाड्:मयीन प्रबल्भता अधोरेखीत करुन मूलभूत स्वरुपाचे चिंतन मांडले आहे. त्यातील काही ठळक निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**निष्कर्ष :**

- डॉ.श. नू. पठाण यांनी 'टाकीचे घाव' या आत्मचरित्रात शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) ते कुलगुरु पदापर्यंतचा आपला शैक्षणिक संघर्ष चित्रित केलेला आहे.
- प्रस्तुत आत्मचरित्राचे शीर्षक अतिशय अनन्वय आहे. लेखकाचे वडील गवंडी काम करतांना दगडांवर टाकीचे घाव घालून

आकार दयायचे, असेच असंख्य घाव डॉ. श. नू. पठाण यांनी आपल्या आयुष्याला देऊन त्यातून सुंदर, आखीव– रेखीव आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व घडविले आहे.

- लेखकाला एखादया प्रसंग वा घटनेची तारीख निश्चितपणे आठवत नसल्यामुळे त्या तारखांचा अंदाज व्यक्त करुन आपल्या प्रामाणिकपणाचा आणि साधेपणाचा प्रत्यय आणून दिलेला आहे.
- रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' या उपक्रमामुळे लेखकाला आपले शिक्षण पूर्ण करता येऊन पुढे कुलगुरु पदापर्यंत पोहचता आले.
- 'प्रेम देणे आणि प्रेम घेणे' ही लेखकाची स्वाभविक प्रवृत्ती आहे म्हणून ते सर्वधर्मसमभावाचे प्रतीक वाटतात. गावात हिंदू–मुस्लीम आणि अस्पृश्य समुदायात सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करुन त्यात ते यशस्वी होताना दिसतात.
- संपूर्ण आत्मचरित्रात कुठेही आक्रस्ताळेपणा नाही. जे जीवण त्यांच्या वाटयाला आले, त्याचा हसतमुखाने स्वीकार करुन तथा आपल्या दारिद्रियरचे प्रदर्शन न मांडता ते दूर करण्यासाठी अपार कष्ट करण्याची त्यांची भूमिका वाखाणण्याजोगी आहे.
- चारित्र्यसंवर्धन, विनम्रता, सौजन्यशिलता, सहकार्याची भावना, बंधुभाव, सचोटी, प्रामाणिकपणा आणि देशभक्ती या मूल्यांची बेरीज त्यांच्या व्यक्तिमत्वात एकवटल्याचा आपल्याला प्रत्यय येतो.
- येथील निवेदन प्रमाण मराठीत आहे. भाषाशैली साधी, सरळ आहे. कुठेही अलंकारप्रचुरता नाही. वाक्यप्रचार, म्हणी, उखाणे वा तत्सम भाषेतील सौंदर्यप्रसाधने येथे नाहीत, तरीही अंतर्मुख होऊन वाचकांस खिळवून ठेवण्याची ताकद त्या पुस्तकात आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) डॉ. पठाण श. नू – 'टाकीचे घाव', विजय प्रकाशन, नागपूर २००८

२) कुळकर्णी आरती – 'दलित स्वकथने': साहित्यरुप, विजय प्रकाशन, नागपूर १९९१.

३) धोंगडे रमेश – 'दलित आत्मचरित्रे: साहित्य व समाज', मधुराज प्रकाशन, पुणे. १९ जाने. १९९२

४) सूर्या अनिल – 'आंबेडकरवादी स्वकथनांचा समाजशास्त्रीय अभ्यास', सुगावा  प्रकाशन, पुणे. ऑक्टो. १९९६.